




शिल्पकार विकासाचा...

# देशदूत








इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव आवृत्ती । रविवार, दि. १ जून २०२५ । | मोबाईल आवृत्ती वाचा व वर




भोपाळ । राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना कर्मभूमी मध्य प्रदेशातील महेश्वर येथे अभिवादन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी.

## अहिल्यादेवींचा जीवनपट चित्रपटाद्वारे साकारणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौंडीमध्ये केली घोषणा

**अहिल्यानगर ।** छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास छावा चित्रपटाच्या माध्यमातून दाखवण्यात आला, त्याचप्रमाणे राज्य सरकार अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर चित्रपट काढणार असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त आज चौंडीमध्ये भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची उपस्थिती होती. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारने अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर केले. राम शिंदे आणि आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आजच्या या कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. यासाठी जेव्हा मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटलो तेव्हा त्यांनी मला सांगितले की, एकीकडे अहिल्यादेवी यांचे जन्मस्थळ आहे आणि दुसरीकडे कर्मस्थळ आहे.यावेळी मी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राजधानीत कर्मस्थळावर सभा घेणार आहे. मात्र पुढच्यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळी नक्की येईल, असे फडणवीस यांनी सांगितले. पुढे बोलताना म्हणाले की, अहिल्यादेवी यांनी २८ वर्ष राज्यकारभार सांभाळला. छत्रपती शिवरायांनंतर लोककल्याणकारी राज्य चालवणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांचे नाव येते. भारतात बनलेल्या ब्रम्होसने पाकिस्तानची तळं उद्ध्वस्त केली, त्याचप्रमाणे अहिल्यादेवी यांनी बलशाली तोफखाना तयार केला होता, त्यामुळे त्यांच्या राज्यावर कोणीही हल्ला करण्याचे धाडस केले नाही.



अहिल्यानगर । राजमाता अहिल्यादेवी होळकर यांना जन्मभूमी असलेल्या चौंडी येथे अभिवादन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.

# नारिशक्ती सामर्थ्याचे प्रतिक-पंतप्रधान

**भोपाळ ।** ऑपरेशन सिंदूर हे नारीशक्तीच्या सामर्थ्याचे प्रतीक बनले आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे की, या ऑपरेशनमध्ये बीएसएफने खूप मोठी भूमिका बजावली आहे. बीएसएफच्या मुली काश्मीरपासून गुजरातपर्यंत जबाबदारी घेत होत्या. त्यांनी सीमेपलीकडून होणाऱ्या गोळीबाराला प्रत्युत्तर दिले आहे. बीएसएफच्या शूर कन्यांनी अद्भुत शौर्य दाखवले आहे. संपूर्ण जग मुलींचे शौर्य पाहत आहे. ही प्रेरणा राजमाता अहिल्याबाईंमुळेच मिळाली असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी मध्य प्रदेशातील भोपाळ येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महिला सक्षमीकरण महासंमेलनात सहभागी झाले आणि अनेक प्रकल्पांची सुरुवात केली. याच



दरम्यान जाहीर सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, ऑपरेशन सिंदूर हे दहशतवादाविरुद्धचे सर्वात मोठं ऑपरेशन आहे. आपल्या सैन्याने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले आहेत. पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी केवळ भारतीयांचे रक्त सांडलं नाही तर त्यांनी आपल्या संस्कृतीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी आमच्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. दहशतवाद्यांनी भारताच्या नारीशक्तीला आव्हान दिले आहे. हे आव्हान दहशतवाद्यांसाठी आणि त्यांच्या आकांसाठी काळ ठरले आहे. भारतातील प्रत्येक नागरिक म्हणत आहे की, जर तुम्ही गोळी झाडली तर गोळीचे उत्तर गोळीनेच दिले जाईल. पाकिस्तानी सैन्याने याचा विचारही केला नव्हता, तिथे जाऊन आमच्या सैन्याने दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. सिंदूर हे आमच्या परंपरेचं प्रतीक आहे, आता ते भारताच्या शौर्याचं प्रतीक आहे

### ऑपरेशन सिंदूर सर्वात मोठे ऑपरेशन

ऑपरेशन सिंदूर हे भारताच्या इतिहासातील दहशतवाद्यांविरुद्धचं सर्वात मोठं आणि सर्वात यशस्वी ऑपरेशन आहे असे पंतप्रधानांनी म्हटले आहे. आम्ही घरात घुसून मारू आता आम्ही घरात घुसूनही मारू आणि दहशतवाद्यांना मदत करणाऱ्यांनाही त्याची मोठी किंमत मोजावी लागेल, असेही यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

## थोडक्यात

### पुण्यात कारचालकाने १२ जणांना चिरडले

**पुणे ।** पुण्यात भीषण अपघात झाला आहे, कारचालकाने बारा जणांना उडवले आहे. हे बाराही जण एमपीएससीचे विद्यार्थी असल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेतील जखमींना पुण्यातील संचेती व मोडक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. पुण्यातील भावे हायस्कूलजवळ हा अपघात घडला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार हा कारचालक मद्यधुंद अवस्थेमध्ये होता. पुण्यातील भावे हायस्कूल जवळ हा भीषण अपघात घडला आहे.

### एनडीएसोबत जाण्याचा जानकरांना पश्चाताप!

**मुंबई ।** पुण्याश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त एक कार्यक्रम दिल्लीतही घेण्यात आला. या कार्यक्रमत राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी केलेल्या विधानाची चांगलीच चर्चा होत आहे. एनडीएसोबत आम्ही युती केली ही आमची चूक होती, असे जानकर यांनी म्हटलेय. राष्ट्रीय समाज पक्षातर्फे नवी दिल्लीच्या तालकटोरा स्टेडियमवर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होलकर त्रिशताब्दी जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी जानकर भाषण करत होते. यावेळी त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

## फडणवीसांनी शिंदेंचा राजीनामा घ्यावा!

**मुंबई ।** सर्वोच्च न्यायालयाने एमएमआरडीएला ठाणे-घोडबंदर ते भाईंदर बोगदा आणि उन्नत मार्ग या प्रकल्पाचे १४ हजार कोटीची निविदा रद्द करण्याचे आदेश दिल्याने यामध्ये घोटाळा झाल्याचे सिद्ध झाले आहे. एमएमआरडीएच्या निविदा घोटाळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच जबाबदार असून मचंदा दो, धंदा लोफ या स्किमचे हे उदाहरण असल्यानेच सरकारला माघार घ्यावी लागली, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते



**आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल**

आदित्य ठाकरे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केला. त्यामुळे स्वच्छ कारभाराची अपेक्षा करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदेंचा राजीनामा घेऊन त्यांची ईडी, इन्कम टॅक्स आणि न्यायालयीन चौकशी करावी, अशी मागणीही त्यांनी यावेळी केली. सर्वोच्च न्यायालयाने इशारा दिल्यानंतर एमएमआरडीएवर ठाणे-घोडबंदर ते भाईंदर बोगदा आणि उन्नत मार्ग प्रकल्पाची निविदा रद्द करण्याची नामुष्की ओढावली. या पार्श्वभूमीवर आदित्य ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन एकनाथ शिंदे आणि भाजप सरकारवर निशाणा साधला. निवडणूक काळात भाजपला ६०० कोटींचे दान देणाऱ्या मेघा इंजिनीअरिंगला कंत्राट देण्यासाठी गोलमाल करणारे महायुती सरकार सर्वोच्च न्यायालयात तोंडावर आपटले आहे.

### भाजपच्या नूतन जिल्हाध्यक्षांची नियुक्ती

**मुंबई ।** महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्र प्रदेश भाजपने संघटनात्मक बदल केले असून शनिवारी उर्वरित २२ नव्या जिल्हाध्यक्षांची नियुक्त्या जाहीर केल्या. भाजपचे प्रदेश निवडणूक अधिकारी आमदार चैनसुख संचेती यांनी याबाबतची घोषणा केली. यापूर्वी भाजपने ५८ जिल्हाध्यक्ष नेमले आहेत. त्यामुळे भाजपच्या राज्यातील जिल्हाध्यक्षांची संख्या आता ८० वर पोहचली आहे.

## तीन दिवसांत सैन्याने लक्ष्य साध्य केले!

**नवी दिल्ली ।** शस्त्रसंधीच्या निर्णयास सुमारे २० दिवस झाले. त्यानंतर आता याबद्दल स्पष्टीकरण आले आहे. शनिवारी सिंगापूरमध्ये झालेल्या शांग्री-ला संवादमध्ये सीडीएस जनरल अनिल चौहान यांनी त्याचे कारण स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, भारताने हे पाऊल उचलण्यामागे रणनीतीचा भाग आहे. भारताने तीन दिवसांत आपले ठरवलेले सर्व लक्ष्य साध्य केले होते. यामुळे कारवाई थांबवणे योग्य पाऊल आहे असे स्पष्ट केले आहे.भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानला धडा शिकवण्याचा



**शस्त्रसंधीवर सीडीएस अनिल चौहान यांचे प्रतिपादन**

निर्णय घेतला. त्यासाठी ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आले. ऑपरेशन सिंदूर शिगेला पोहचले असताना १० मे रोजी संध्याकाळी भारत आणि पाकिस्तानमध्ये अचानक शस्त्रसंधीची घोषणा झाली. या निर्णयाबद्दल अनेकांना आश्चर्य वाटले. जनतेच्या मनात हा प्रश्न निर्माण झाला की इतक्या लवकर हा निर्णय का घेण्यात आला. ऑपरेशन सिंदूर ६-७ मे रोजी रात्री झाले. त्यात पाकिस्तान आणि पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवाद्यांची तळ उद्ध्वस्त करण्यात आली. या कारवाईत १०० पेक्षा जास्त दहशतवादी मारले गेले. त्यात जैश-ए-मोहम्मदचा नेता अब्दुल रऊफ अझहर याचाही समावेश आहे.

## ...तर मी राजकारण सोडेन!

**अरविंद केजरीवाल यांचे भाजपाला आव्हान**

**वडोदरा ।** गुजरातमधील विसावदर विधानसभा जागेवर होणाऱ्या पोटनिवडणुकीवरून राजकारण तापले आहे. आज आम आदमी पक्षाने येथे एक रोड शो आयोजित केला होता, ज्यामध्ये अरविंद केजरीवाल, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान आणि दिल्ली सरकारच्या माजी मुख्यमंत्री आतिशी सहभागी झाल्या होत्या. या रोड शोद्वारे आपनेभाजपाचा बालेकिल्ला असलेल्या गुजरातमधील विसावदरमध्ये आपली ताकद दाखवली.

मी तुम्हाला आव्हान देतो गोपाल इटालिया यांना फोडून दाखवा, जर तुम्ही त्यांना फोडू शकलात तर मी राजकारण सोडून देईन.असा इशारा भाजपाला दिला. केजरीवाल यांनी आपल्या भाषणात काँग्रेसवरही टीका केली आणि म्हटले की काँग्रेस हा एक नंबरचा फसवा पक्ष आहे. या विधानाद्वारे त्यांनी सूचित केले की आप आता स्वतःला बळकट करण्याच्या उद्देशाने गुजरातच्या राजकारणात प्रवेश करत आहे. भगवंत मान आणि आतिशी यांनी रोड शो दरम्यान जनतेकडून पाठिंबा मागितला आणि आपचे प्रामाणिक राजकारण पुढे नेण्याबद्दल सांगितले. पोटनिवडणुकीसाठी १९ जून रोजी मतदान होणार आहे तर २३ जून रोजी मतमोजणी होणार आहे.



## जातीय तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न



**सोमैयांवर गुन्हा नोंदवण्याची अबू आझमींची मागणी**

**मुंबई ।** भाजप नेते किरीट सोमैया हे मुंबईतील मशिदींवरील ध्वनीक्षेपक हटवण्यासाठी पोलिसांवर दबाव टाकत असून धार्मिक द्वेष वाढवण्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात यावा, अशी मागणी समाजवादी पक्षाचे आमदार प्रदेशाध्यक्ष अबू असीम आझमी यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केली.

धार्मिक स्थळांवर ध्वनीक्षेपक लावण्यासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्या सूचना केवळ मशिदींना लागू नाहीत. मुंबईतील मशिदी ध्वनीक्षेपक नियमांचे पालन करत आहेत. मात्र, मतपेटीचे राजकारण करण्यासाठी भाजपचे नेते हा मुद्दा केंद्रस्थानी आणत आहेत, असा आरोप आझमी यांनी केला.

किरीट सोमैया हे मुंबईतील मशिदींची पाहणी करत असून यामुळे मुस्लिम धर्मियांमध्ये असंतोष आहे. सोमैया यांच्याविरोधात गुन्हा नोंद न केल्यास याप्रकरणी न्यायालयात दाद मागितली जाईल. धार्मिक स्थळावरील ध्वनीक्षेपकाविषयी स्थानिक हिंदू-मुस्लिमांना आक्षेप नाही. भाजप याचे राजकारण करत आहे, अशी टीका आझमी यांनी यावेळी केली.

## केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2500 |
| नवती (२) | : 2300 |

## मिस्कीली




## निलेश चव्हाणला पोलीस कोठडी



**पुणे ।** पुण्यातील वैष्णवी हगवणे यांच्या बाळाची हेळसांड केल्याचा आरोप असणाऱ्या निलेश चव्हाण याला पोलीस कोठडी मिळाली आहे. त्याला ३ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश शिवाजीनगर न्यायालयाने दिले. शुक्रवारी पिंपरी चिंचवड पोलिसांनी त्याला नेपाळमध्ये अटक करुन शनिवारी पहाटे पुण्यात आणले होते. निलेश चव्हाण हा गेल्या नऊ दिवसांपासून फरार होता.

त्याच्या शोधासाठी पोलिसांची सहा पथके रवाना झाली होती. अखेर शुक्रवारी त्याला नेपाळ सीमेजवळ अटक करण्यात आले. त्यानंतर विमानाने पुण्यात आणण्यात आले. त्याची वैद्यकीय चाचणी करण्यात आल्यावर शनिवारी सकाळी १० वाजता पुणे येथील शिवाजीनगर न्यायालयात आणले. यावेळी पोलिसांनी निलेश चव्हाण याला पाच दिवसांची पोलीस कोठडी द्यावी, अशी मागणी कोर्टात केली. न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर ३ जूनपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

## फडणवीस, शिंदेंची तीन हजार कोटींची लाचखोरी

### काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

**मुंबई ।** घोडबंदर-भाईंदर बोगदा आणि उन्नत मार्ग प्रकल्पावरून सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला मोठी चपराक लगावली आहे. न्यायालयात सरकारचे पितळ उघडे पडल्याने निविदा रद्द करण्याची वेळ सरकारवर आली. या प्रकल्पात मोठे गौडबंगाल असून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ३ हजार कोटी रुपयांची लाच घेतली आहे, असा गंभीर आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी शनिवारी नवी दिल्लीत बोलताना केला. या प्रकरणी न्यायालयीन चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.



एमएमआरडीएने या प्रकल्पातून दुसऱ्या निविदाधारकाचे टेंडर तांत्रिक बाबीचे कारण देत रद्द केले. या कामाचे टेंडर ज्या कंपनीला दिले ती मेघा इंन्फ्रास्ट्रक्चर कंपनी कोणाची आहे? यामागे काय गौडबंगाल होते? हे आता सर्वांसमोर आले आहे. एमएमआरडीएने आता टेंडर रद्द केल्याने हा विषय संपत नाही. हा विषय भ्रष्टाचाराचा आहे, असे सपकाळ म्हणाले.

राज्यात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी भ्रष्टाचाराचा कॉरिडॉर तयार केला असून एमएमआरडीए, म्हाडा, सिडको, एसआरए यांचे एक वर्तुळ आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाल्यापासून भ्रष्टाचाराचे हे वर्तुळ सुरु आहे. यासाठी लाडके अधिकारी नियुक्त केले जातात आणि यातून लाडका ठेकेदार योजना राबविली जाते, अशी टीका सपकाळ यांनी केली.

हा विषय केवळ एका प्रकल्पापुरता नसून राज्यात समृद्धी महामार्ग, पुणे रिंगरोड, विरार अलिबाग कॅरिडॅार आता आता शक्तीपीठ महामार्ग हे सर्व प्रकल्प भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहेत. सत्तेतून संपत्ती आणि संपत्तीतून सत्ता हे दुष्टचक्र सुरु असून ठाणे, मुंबई परिसरातील प्रकल्प हे या गौडबंगालाचे भाग आहेत. मुंबई, ठाणे, कल्याण डोंबिवली, मिरा-भाईंदर, नवी मुंबईसह राज्यातील महानगरपालिकांवर प्रशासक राज आहे. फडणवीस आणि शिंदे यांनी या माध्यमातून रॅकेट सुरु केले आहे. यातून तब्बल १ लाख कोटी रुपयांचा भ्रष्टाचार होत असल्याचे दिसत आहे,असा दावा सपकाळ यांनी केला.

## मला फडणवीसांनी राष्ट्रवादीत पाठविले

### आ.प्रताप पाटील चिखलीकरांचा गौप्यस्फोट



**नांदेड ।** राष्ट्रवादीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी त्यांच्या राष्ट्रवादीतील प्रवेशाविषयी मोठे वक्तव्य केले आहे. विधानसभेसाठी जास्तीत जास्त जागा निवडून येण्यासाठी महायुतीत मित्र पक्षांनी एकमेकांना सांभाळून घेतल्याचे त्यांच्या एका वक्तव्यावरून समोर आले आहे. चिखलीकरांच्या या वक्तव्याने त्यावेळची समीकरणं समोर आली आहे. मी स्वत:हून पक्ष सोडला नाही, एड्जस्टसाठी देवेंद्र फडणवीस यांनी मला राष्ट्रवादीत पाठवले, असा गौप्यस्फोट आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी केला. तसे हे उघड गुपित आहे, हे वेगळं सांगण्याची गरज नाही. प्रेमात, लढाईत आणि राजकारणात सर्व काही माफ असते अस म्हणतात ते काही वावगे नाही.




cmyk